# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १८/११/२०२३

## दुखापत:-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नागपुरी गेट अप क्र. ५८२/२०२३ कलम ३२४, ५०४, ३४ भादवी | इतवारा बाजार अमरावती | दि. १७/११/२०२३ चे १९/३० वा दाखल ता.वेळ दि. १७/११/२०२३ चे २१/५३ वा | तनविर शाह साबीर शाह वय २२ रा. अलीम नगर अमरावती | १)अब्दुल अकील अ. लतीफ वय ४४ वर्ष रा. गुलीस्ता नगर अमरावती २)अब्दुल हकीम अब्दुल लतीफ वय ४२ वर्ष रा. भातकुली | हकीकत अशा प्रकारे आहे `. की यातील नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी यातील फिर्यादीचे हे ` रहेमान भाई यांचे फर्निचरचे दुकानासमोर फटाके फोडत असतांना या कारणा वरुन नमुद दोन्ही आरोपी यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन लाकडी काढीने मारहान केली व आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे डोक्यावर लाठीने मारुन जखमी केले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टी. वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ विनयभंग :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. ९७३/२०२३ क. ३५४,३२३, ५०४,५०६ भादवि. | अमरावती | घटना ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे १९/३० वा. दाखल ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे २२/२४ वा. | एक महिला | शंकर यादव | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी ही नेहमी प्रमाणे मंदीरात दर्शन करायला गेली असता तेथे आरोपी हा मंदीराचा दरवाजा लावत होता. फिहे तेथे पोहोचताच त्याने मंदीराचा दरवाजा लावुन घेतला. फि हे दर्शनासाठी जात असता आरोपी याने फिस मारझोड करण्यास सुरुवात केली. मंदीराच्या कोप-यात नेले व लोट लाट करुन फिला खाली पाडले. व त्यामुळे फिच्या तोंडाला व पायाला मार लागला आहे. फिचे केस ओढले व फिला शिवीगाळ करुन तु या मंदीरात यापुढे दिसली तर तुला जिवानिशी मारुन टाकणार अशी धमकी दीली . अश्य फिर्यादीचा जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे. गाडगेनगर अप क्र १३७४/२०२३ कलम ३८० , ४५४, ४५७ भादवी | जवाहर नगर अमरावती | दि.१३/११/२३ ते १६/११/२३ दरम्यान<br><br>दा ता वेळ दि.१७/११/२३ चे २०/५५ वा | बाळकृष्ण त्र्यंबकराव जाधव वय ६२ वर्ष रा.जवाहर नगर अमरावती | अज्ञात ईसम | नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे परीवारासह घराला कुलुप लावुन मनमाड येथे गेले होते. फिर्यादी यांचे कडे काम करणारी महीला यांचा फिर्यादी यांना फोन आला की तुमच्या घरा चा दरवाजा उघडा आहे. .नमुद घटना ता. वेळी व ठीकाणी फिर्यादी हे कुटुबासह घरी परत आले असता त्यांना घराला कुलुप दिसले ऩाही घरातील पाहणी केली असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले व बेडरुम मधील कपाटातील चांदीचे ३ सिक्के २० ग्रंम की.अं.६००/- रुपये व १० ग्रॅम की.अं.३००/- रु आणी ५ ग्रॅम की.अं.१००/- रु असे एकुन १०००/-रु.चे सिक्के आणी पर्स मधील ७०००/- रुपये ज्यामध्ये ५०० रुच्या १० नोटा व १०० रु.च्या २० नोटा असे ७०००/-रु असा एकुन ८०००/- रु चा माल दिसुन आला नाही तो कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला. अशा फिर्यादी यांच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो. स्टे कोतवाली अप क्र ५३०/२३ कलम ३७९ भादवि | अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि १७/११/२३ चे १५.०० वा<br>गुन्हा दा. ता.वेळ दि १७/११/२३ चे २०.२२ वा | एक महिला रा. अमरावती | अज्ञात | हकीकत असा प्रकारे आहे की फिर्यादी हे अंबादेवी दर्शकरीता मंदीरात गेले असता दर्शन करुन परत आले व समोरील दुकानामध्ये लोखंडी कढाई घेणे करीता थांबले व कढई घेतल्यावर पैसे देणे करीता पर्स पाहीले असता काळया गंगाचे पर्स मधील लहाण पर्स मधील ५०००/- रु ठेवलेले होते ते कोणातरी अज्ञात चोराने चोरुन नेले. अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन डि ओ सा आदेशाने सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ विश्वासघात (फसवणुक) :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो. स्टे कोतवाली अप क्र ५२९/२३ कलम ४२०,४१९, ४६५, ४६८, ४७१, १२०(ब) भादवि | सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग २ अमरावती ग्रामीण कार्यालय अमरावती | गु घ. ता वेळ दि ३/१/२३ चे ३१/०३/२३ दा. ता वेळ दि १७/११/२३ १६.०६ वा. | पकंज मधुकर आगरकर वय ५० वर्ष रा विडुकिंप हिंगणे माळा ससाणे नगर हडपसर पुणे | १) सुरेश श्रीकृष्ण राव टाले वय ४३ रा रेवसा अमरावती २) कनैय्या घनशाम पांडै वय ३२ रा दहीसार चौक अमरावती ३)किशन चंपालाल भट्टड वय ६२ वर्ष रा जैन मंदीरा जवळ अरीहंत नगगर प्लॉट नं २१ चंद्रपुर ४) अभिजीत विडय गरऴ रा बजरंग नगर आनंदवली नाशिक ५) शेखर गोपालराव काळमेघ रा धामनगाव अमरावती ६) सुनिल | हकीकत अशा प्रकारे् आहे की फिर्यादी यांनी दि ४ जुन १९९६ रोजी कठोरा बु ता जि अमरावती येथील शेत सर्व नं ७७/२ मधील प्लॉट क्र ३७ ही मालमत्ता श्री हेमंत कुमार रामनिवासजी व्यास यांटे कडुन नोदणी अनु क्र ११०५ व्दारे दुय्यम निबंधक कार्यालय अम ग्रा. येथे रक्कम रु ७९०८/- मात्र ने खरेदी करुन व्यवहार नोदणी कृत केला होता ही मनालमत्ता आज पावेतचो कोणासह विकली अगर अथवा कोणत्ाही प्रकारे लिहुन दिली नाही ती आजही माझ्या प्रत्यक्ष कब्जात आहे फि. यांनी ऑनलाईन प्लॉटचा ७/१२ काढला असता सदर प्लॉटची विक्री झाल्या बद्दल फेरफार नोंद दिसुन आली मात्र फि. यांनी असा कोणताही विक्रीचा व्यवहार केला नसल्याने ते बघुन फि, यांना मानसिक धक्का बसला फि. यांनी तलाटी कार्यावयाशी संपर्क साधला असता त्यानी माहीती दिली की सदरचा प्लॉट विक्रीची व्यवहार झालेला आहे असे समजलै त्या नतर तो रजिस्टर ऑफीस मध्ये गेला त्या नतंर फि. यास समजले की सदर प्लॉटची बनावट खरेदी करुन अज्ञात इसमानी विक्री केल्या बद्दल फि. ची खाज्ञी झाली सदर प्लॉटचे कागदपत्र पाहीले असता ते प्लॅाट हे सुरेश श्रीकृष्ण राव टाले वय ४३ रा रेवसा अमरावती यांचे नावे दि ३ जानेवारी २०२३ रोजी दस्त क्र ४२/२३ सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग दोन अमरावती यांचे कार्यालयात रक्कम ४०००००/- मात्र किं वर नोंदविण्यात आला सदर दस्तऐवजावर साक्षीदार म्हणुन १) अभिजीत विडय गरऴ रा बजरंग नगर आनंदवली नाशिक २) शेखर गोपालराव काळमेघ रा धामनगाव अमरावती यांनी साक्षीदार म्हणुन सह्या केल्या आहे सदर दस्तऐनवजाचे अवलोकल केले असता कोणीतरी अज्ञात इसमाने तो पकंज मधुकर आगरकर रा चैतन्य वाडी दिप कॉलनी वळ बुलढाणा आधार नं मो सदरील आधार कार्डवरील फोटे हा फि. चा नाही सदर इसमाने फिर्यादी यांचा बनावट आधार कार्ड तयार करुन त्याचा दुरुउफयोग केरुन सदरचा प्लॉटच्या विक्रीचा व्यवहार केला सदर प्रकरणात आधार कार्ड व्हेरीफिकेशन झाल्याचे नमुद आहे याचाच अर्थ असा की शासकीय कर्मचारी अधिकारी हे सुध्दा या गैरव्यवहारात सहभागी आहेत सदर मिळ्कत ही फिरेयादीचे मालकीची असुन सुध्दा वरील नमुद सर्व इसमानी जाणुन बुजुन स्वताचा गेरफायदा करुन घेण्याचे इराद्याने खोटे जस्तऐवज बनवुन फि. च नावाचा खोटा इसम उभा करुन फि. ची फसवणुक केली आहे सदर प्रकरणा सह्या करणारे साक्षीदार १) अभिजीत विडय गरऴ रा बजरंग नगर आनंदवली नाशिक २) शेखर गोपालराव काळमेघ रा धामनगाव अमरावती आणि या प्रकरणात त्याना मदत करणारे सर्व शासकीय कर्मचारी अधिकारी व खोटे आधार कार्ड बनविणारे व त्यासाठी मदत करणारे ज्ञात अज्ञात इतर सर्व या सगळयानी मिळुन संगणमताने स्वताचा आर्थिक फायदा करुन घेणे करीता सदरचे कृत्य केले आहे व फिर्यादी यांची फसवणुक केली आहे तसेच फिर्यादी यांनी दि २४/०९/१९९० रोजा मासोद ता. जि अमरावती येथील प्लॅाट सव्ह नंबर २६/११४ मधील प्लॉट नंबर ७७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मानिकराव करवा रा सेट्रल बँक दवळ अमरावती<br>७) अजमत खान लियाकत खान रा भातखेडा अमरावती<br>८) अनोळखी इसम | ही मालमत्ता श्री राजेश किशोर भाई सोनी यांचे कडुन नोंदणी अनुक्रम क्र ६१/१५०५व्दारे दुय्यम निबंधक कार्यालय अमरावती येथे रक्कम ४०००/- मात्र ने खरेदी करुन नोंदणी कृत केला आहे सदर प्लाँटची फि. यांनी आँनलाईन प्लाँटचा ७/१२ काढला असता सदर प्लाँटची विक्री झाल्या बद्दल फेरफार नोंद दिसुन आली मात्र फि. यांनी असा कोणताही विक्रीचा व्यवहार केला नसल्याने ते बघुन फि, यांना मानसिक धक्का बसला फि. यांनी तलाटी कार्यावयाशी संपर्क साधला असत त्यानी माहीतकी दिली की सदरचा प्लाँट विक्रीची व्यवहार झालेला आहे असे समजलै त्या नतर तो रजिस्टर आँफीस मध्य.ये गेला त्या नतंर फि. यास समजले की सदर प्लाँटची बनावट खरेदी करुन अज्ञात इसमानी विक्री केल्या बद्दल फि. ची खाङ्ी झाली सदर प्लाँटचे कागदपत्र पाहीले असता ते प्लाँट हा कनैय्या घनशाम पांडै वय ३२ रा दहीसार चौक अमरावती व )किशन चंपालाल भट्टड वय ६२ वर्ष रा जैन मंदीरा जवळ अरीहंत नगगर प्लाँट नं २१ चंद्रपुर याचे नावे दस्त क्र ३४८७ दि ३१/३/२०२३ रोजी रक्म ३,२५.०००/- ला २३ सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग दोन अमरावती ग्रा यांचे कार्यालयात नोंदविण्यात आला सदरील दस्तावर सह्या करणारे साक्षीदार १) सुनिल मानिकराव करवा रा सेट्रल बँक दवळ अमरावती, २) अजमत खान लियाकत खान रा भातखेडा अमरावती यांना दस्तऐवजावर सह्या केल्या तो र्कज मधुकर आगरकर रा चैतन्य वाडी दिप काँलनी वळ बुलढाणा आधार नं मो नं सदरील आधार कार्डवरील फोटे हा फि. चा नाही सदर इसमाने फिर्यादी यांचा बनावट आधार कार्ड तयार करुन त्याचा दुरुउफयोग केरुन सदरचा प्लाँटच्या विक्रीचा व्यवहार केला सदर प्रकरणात आधार कार्ड व्हेरीफिकेशन झाल्याचे नमुद आहे याचाच अर्थ असा की शासकीय कर्मचारी अधिकारी हे सुध्दा या गैरव्यवहारात सहभागी आहेत सदर मिऴकत ही फिरेयादीचे मालकीची असुन सुध्दा वरील नमुद सर्व इसमानी जाणुन बुजुन स्वताचा गेरफायदा करुन घेण्याचे इराद्याने खोटे जस्तऐवज बनवुन फि. च नावाचा खोटा इसम उभा करुन फि. चाी फसवणुक केली आहे.यावरुन असे दिसुन येते की हेएक रँकेटच आहे जे शासकीय यंत्रनेला हातात धरुन जे मालक बाहेरगावी राहतात त्याची मालमत्ता बनावट कागदपत्र बनवुन व बनावट इसम मालक म्हणुन उभे करुन परस्पर विक्री करीत आहे येणे प्रमाणे फिर्यादी यांनी लेळी रिपोर्ट दिले वरुन पो. उपआयुक्त परि मंडऴ २ आणि वपोनि आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. ९७४/२०२३ क. २८९ भादवि. | लुबीनी नगर, जुना बायपास रोड अमरावती | घटना ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे १४/०० वा. दाखल ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे २२/४७ वा. | अजय भोडराज मंडपे वय ४० वर्ष रा. लुबीनी नगर, जुना बायपास रोड अमरावती | मनोहर शिंदे रा. लुबीनी नगर, जुना बायपास रोड अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आह की यातील फिर्यादी यांचा मुलगा नामे धुर्व अजय मंडपे वय १५ वर्ष हा आरोपी यांच्या घराजवळुन जात असतांनाआरोपी हा त्याच्या घराच्या गेट समोर बसला होता व त्याचा कुत्रा त्याच्या सोबत बाजुला बसलेला होता. यातील आरोपी यांच्या कुत्र्याने फिच्या मुलाच्या पायाच्या मांडीला समोरुन व मागील बाजुने दोन ठिकाणी जोरात चावा घेतला.माझ्या मुलाला जखमी अवस्थेत इर्विण दवाखाणा येथे भरती केले आहे. यातील आरोपी याच्यावर कार्यवाही व्हावी अश्या फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ अकस्मात मृत्यु :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे वलगाव मर्ग क्र. 49/2023 कलम 174 जा.फौ.प्रमाणे दाखल. | ग्राम दर्याबादरोडवर | संतोष किसनराव गुगलमाने वय 31 वर्ष रा. ग्राम शिराळा ता.जि. अम. | फिर्यादि सरतर्फे – सपोउपनि निवासराव घुगे ब.न. 706 पोस्टे वलगाव अम.शहर. | उपचारा दरम्यान मृत्यु | हकिकत अशा प्रकारे आहे कि, आम्ही आज दि.17/11/2023 रोजी पोस्टे अजनी नागपुर शहर येथुन मृतक नामे संतोष किसनराव गुगलमाने वय31 वर्ष रा. ग्राम शिराळा ता.जि.अमरावती हा मेडीकल कॉलेज नागपुर येथे मयत झाल्याने पोस्टे अजनी येथे मर्गक्र. 00/2023 कलम 174 जा.फौ. चा मर्ग दाखल झला. सदर मृतकाची मर्ग डायरी पोस्टे वलगावला आज रोजी प्राप्त झाल्याने व आम्ही सपोउपनि निवासराव घुगे ब.न.706 पोस्टे वलगावची सकाळी 09/00 वा.ते21/00 वा दरम्यान आम्ही सोबत पोकाँ ब.न.122 ची डी.ओ.डयुटी असतांना. सदर मर्ग डायरी पोस्टे ला प्राप्त झाली वरुन सदर डायरी मा. वपोनि सा. समक्ष सादर केली. व त्यांचे आदेशाने सदरचा मर्ग दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो स्टे राजापेठ मर्ग क्रमांक १४८/२०२३ कलम १७४ जा फौ | छत्री तलाव अमरावती दिनांक १७.११.२०२३ चे १८.०० दा ता वेळ दिनांक १७.११.२०२३ चे | अनोळखी पुरूष अंदाजे वय २८ ते ३० वर्ष | सरतर्फे सपोनि मनोज मानकर | छत्री तलाव पाण्यात बुडून मरण पावला | नक्कल जबानी रिपोर्ट आज रोडी आम्ही सोनि मनोजकुमार मानकर सोबत पोका ६९३असे पो स्टे राजापेठ येथे दिनांक १७.११.२०२३ रोजी चे १४.०० ते २१.०० वा पावेतो डि ओ डयुटी असतांना इर्वीण दवाखाना अमरावती येथुन मरणाचा मेमो क्रमांक ३७६४ मृतक अनोळखी पुरूष वय अंदाजे २८ ते ३० वर्ष रा छत्री तलाव अमरावती येथे पाण्यात बुडूण मरण पावला बाबत पो स्टे ला १८.०० वा प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल. |
| ०३ | पो स्टे राजापेठ मर्ग क्रमांक १४९/२०२३ कलम १७४ जा फौ | शिव छाया कॉंलनी शंकरनगर रोड अमरावती दिनांक १७.११.२०२३ चे १५.११ पुर्वी दा ता वेळ दिनांक १७.११.२०२३ चे | सचिन अशोक निकम वय ४८ वर्ष रा किरण नगर अमरावती शहर | सरतर्फे पोहेका निलेश शालीग्राम वानखडे ब.न.८८० पो स्टे राजापेठ | शिव छाया कॉंलनी शंकर नगर रोड अमरावती शहर | नक्कल जबानी रिपोर्ट आज रोजी आम्ही पोहेका निलेश वानखडे ब.न.८८० पो स्टे राजापेठ येथे दिनांक १७.११.२०२३ रोजी चे १४.०० ते २१.०० वा पावेतो तपास मदत डयुटी असतांना स्टे डा साना क्रमांक ३०/२०२३ वेळ १५.११ वर फोन द्वारे मुन्ना राठोड (माजी नगर सेवक) यांनी त्यांचे मो द्वारे माहिती दिली की शंकर नगर मागे शिवछाया कॉंलनी शंकरजीचे मंदीराजवळ वानखडे यांचे घरा जवळ एक इसम मृत अवस्थेत पडलेला आहे सदर माहिती वरून डि ओ सपोनि मानकर यांचे सह घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता एक इसम पडुन असलेला दिसला आजु बाजुला जमविल्या लोकांनी ओळख पटवुन सांगीतले की नमुद इसम हा सिचन अशओक निकम वय ४८ वर्ष रा किरण नगर अमरावती हा आहे वरून नमुद पडुन असलेल्या इसमान डि ओ यांचे आदेशान्वये जि सा रू अमरावती येथे नेऊन डॉंक्टर सा यांनी नमुद इसमाची तपासणी करून नमुद इसमास मृत घोषीत करून मरणआचा मेमो क्रमांक ३७६२ दिल्या वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला |

## ➢ जुगार रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नागपुरी गेट अमरावती शहर | अप क्र.५८१/२०२३ कलम १२(अ) म.जु. का | पठान चौक शफी भंगारवाला यांचे दुकाना मागे अमरावती | दि. १७/११/२०२३ चे १४/५० वा ते १४/४५ वा | दि. १७/११/२०२३ चे १६/५५ | म स. पो. नि. चव्हाण पो. स्टे. नागपुरी गेट अमरावती शहर | १)अब्दुल वहीद अब्दुस सहीद वय ३८ वर्ष रा. गुलीस्ता नगर २)शंकर प्रेम गुप्ता वय ३२ वर्ष रा. पटवा चौक मसानगंज ३) किशोर रामरावजी वानखडे वय ४४ वर्ष रा. कुंभारवाडा खडकाळीपुरा ४)अमीन खान रहेमान खान वय ३५ वर्ष रा. हबीब नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी व सोबत मा. पोलीस आयुक्त सा. यांचे अवैध्यधंद्यावर कार्यवाही करणारे पथक मधिल सपोनि महेद्र इंगळे व सोबत स्टॉंफ सह जुगार रेड व प्रोव्ही रेड करणे कामी पो. स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना नमुद घटणा ता. वेळी व ठीकाणी त्यांना गुप्त बातमीदारा कडुन खात्री लायक माहीती मिळाली की पठान चौक झिब्राईल बाबा दर्गा जवळ मोकळ्या जागेत काही ईसम ५२ तास पत्यांचा एक्का बादशाह प्रकारचा पैशाची हारजीत जुगार खेळ खेळवित आहे. अशा मिळालेल्य माहीती वरुन पोलीस स्टॉंप व पंच यांचे समक्षजुगार रेड केली असता नमुद आरोपी हे ५२ तास पत्यांचा एक्का बादशाह प्रकारचा पैशाची हारजीत जुगार खेळ पैसे लावुन खेळत असतांना मिळुन आल्याने त्यांना जागीच पकडुन त्यांच्या पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातुन १)नगदी ८२१०/- रु २) ५२ तास पत्ते कि. ५०/- रु असा एकुण ८२६०/- रु चा माल नमुद आरोपी यांचे कृत्य कलम १२(अ) म.जु. का म. जु. का. प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा | अप. न.९७२/ २०२३ क. ६५(फ) मदाका | जयस्वाल गल्ली फ्रेजरपुरा अमरावती | घटना ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे १६/४५ वा. | दाखल ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे २०/४५ वा. | पोहेकाँ. सुनील सोळंके ब. न. २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती | रन्नु रमजान रायलीवाले वय ६१ वर्ष रा. फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टाँफ सह पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की यातील आरोपी हा त्याच्या राहत्या घरासमोर दारु विक्री करीत आहे. अश्या माहीती वरुन त्याच्या प्रेव्ही रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १० लीटर गा.ह.भ. ची दारु २०० लीटर प्रमाणे प्लास्टीक डबकीसह एकुण २०००/- रुपयाचा प्रोव्ही माल मिळुन आला अश्या फिच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे फ्रेजरपुरा | अप. न.९७१/२०२३ क. ६५(फ) मदाका | जयस्वाल गल्ली फ्रेजरपुरा अमरावती | घटना ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे १४/४५ वा. | दाखल ता वेळ - दि. १७/११/२०२३ चे १८/२३ वा. | पोहेकाँ. सुनील सोळंके ब. न. २८९ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती | पिरु खन्नु रायलीवाले वय २८ वर्ष रा. फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो स्टाँफ सह पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की यातील आरोपी हा त्याच्या राहत्या घरासमोर दारु विक्री करीत आहे. अश्या माहीती वरुन त्याच्या प्रेव्ही रेड केली असता त्याच्या ताब्यातुन ०५ लीटर गा.ह.भ. ची दारु २०० लीटर प्रमाणे प्लास्टीक डबकीसह एकुण १०००/- रुपयाचा प्रोव्ही माल मिळुन आला अश्या फिच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |